# ‘नियमीत प्रसिध्दी पत्रक’
# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद.

बुधवार, दि.१८/११/२०२०
वेळ: १९.००

## “मोटार वाहन कायदा अंतर्गत १७९ कारवाया- ४५,७०० ₹ ‘तडजोड शुल्क प्राप्त.”

उस्मानाबाद जिल्ह्यातील महत्वाच्या रस्त्यांवर दि. १७.११.२०२० रोजी १८ पोलीस ठाणी व उस्मानाबाद शहर वाहतुक शाखा यांनी मोटार वाहन कायदा अंतर्गत १७९ कारवाया करुन ४५,७०० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल केले आहे.

## “अवैधरीत्या तलवार बाळगणाऱ्यावर कारवाई.”

**पोलीस ठाणे, भुम:** संदीप शहाजी सोनवणे, रा. चिंचपुर (ढगे), ता. भुम हा दि. १७.११.२०१९ रोजी १२.१० वा.सु. गावातील मारुती मंदीराजवळील चिंचेच्या झाडाखाली अवैधरीत्या तलवार बाळगला असतांना पोलीस ठाणे, भुम यांच्या पथकास आढळला. यावरुन पोलीसांनी सरकातर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन संदीप सोनवणे याच्याविरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम- ४, २५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “फसवणूक.”

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रा.):** “कौन बनेगा करोडपती मधून मी राणा प्रताप सिंह, कोलकत्ता येथून बोलतोय तुम्हाला चारचाकी गाडी व २५ लाखाची लॉटरी लागली आहे. त्यासाठी खाते उघडण्यासाठी मी दिलेल्या बँक खात्यांत तुम्हाला काही रक्कम जमा करावी लागेल.” असा फोन कॉल श्रीमती- निता अशोक डिसले, रा. चिलवडी, ता. उस्मानाबाद यांना दि. १५.०६.२०२० पासून अनेकदा आला. यावर निता डिसले व त्यांचा मुलगा- रामराजे यांनी त्या समोरील व्यक्तीने वेळोवेळी पाठवलेल्या एसबीआय च्या १२ बँक खात्यांत एकुण ३,५०,००० ₹ वेगवेगळ्या ग्राहक केंद्रात जाउन भरले. तरीही त्या अज्ञात व्यक्तीने निता डिसले यांना कॉल करुन “आणखी १,५०,००० ₹ भरल्यास आम्ही गाडी व २५ लाख रुपये घेउन तुमच्या घरी येउ.” असे सांगीतल्याने निता डिसले यांचा संशय बळावला आणि आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. अशा मजकुराच्या निता डिसले यांनी आज दि. १८.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४२० अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “चोरी.”

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** जावेद लालमहंमद मुजावर, रा. वत्सला नगर, अणदुर, ता. तुळजापूर हे कुटूंबीयांसह राहत्या घरी दि. १६ व १७.११.२०२० दरम्यानच्या रात्री झोपलेले असतांना अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या मागील भींतीवरुन घरात प्रवेश करुन आतील रेडमी व विवो असे दोन मोबाईल फोन व ७,००० ₹ रोख रक्कम चोरुन नेली. अशा मजकुराच्या जावेद मुजावर यांनी काल दि. १७.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४५७, ३८० अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, आंबी:** उत्तरेश्वर अजिनाथ साबळे, रा. तिंत्रज, ता. भुम यांनी आपली हिरो मो.सा. क्र. एम.एच. २५ एक्स ७६२० ही दि. १६.११.२०२० रोजी रात्री २२.३० वा. सु. राहत्या घरासमोर ठेवली होती. ती मोटारसायकल दुसऱ्या दिवशी सकाळी तेथे न आढळल्याने ती अज्ञात चोरट्याने चोरुन नेली आहे. अशा मजकुराच्या उत्तरेश्वर साबळे यांनी काल दि. १७.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, कळंब:** अजय हारकचंद करनावट, वय ४८ वर्षे, रा. शिवाजी चौक, कळंब हे दि. १७.११.२०२० रोजी रात्री ०१.१५ कळंब येथील स्वत:च्या ‘अथर्व इंजिनीयरिंग’ दुकानासमोरील बाकावर झोपले होते. यावेळी आठ अनोळखी पुरुषांनी तेथे येउन अजय करनावट यांना लोखंडी गजाने, बिअरच्या बाटलीने मारहाण करुन जखमी केले व त्यांच्या गळ्यातील २० ग्रॅम सोन्याची चैन हिसकावून निघून गेले. अशा मजकुराच्या अजय करनावट यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३९५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, तामलवाडी:** हनमंत तानाजी गोरे, रा. दहिवडी, ता. तुळजापूर यांच्या दहिवडी सर्वे क्र. ४२९ मधील शेतातील सोयाबीनचे ५ पोते दि. २४.१०.२०२० रोजी ०६.३० ते ०९.३० वा. सु. अज्ञात चोरट्याने चोरुन नेले आहेत. अशा मजकुराच्या हनमंत गोरे यांनी आज दि. १८.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “अपघात.”

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रा.):** सलीम ईस्माईल शेख, वय ४५ वर्षे, रा. येडशी, ता. उस्मानाबाद हे दि. २५.१०.२०२० रोजी २३.०० वा. सु. दिल्ली दरबार चौक, येडशी येथील रस्त्याने पायी चालत जात होते. यावेळी अज्ञात वाहनाने त्यांना पाठीमागून जोराची धडक दिल्याने सलीम शेख हे गंभीर जखमी होउन वैद्यकीय उपचारादरम्यान मयत झाले. अशा मजकुराच्या शाहिद सलीम शेख (मयताचा मुलगा) यांनी काल दि. १७.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) आणि मो.वा.का. कलम- १८४, १३४ (अ) (ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, वाशी:** रामलिंगे रमेश सारणे, वय २५ वर्षे, रा. औसा, जि. लातुर यांनी दि. १०.११.२०२० रोजी १२.३० वा. सु. विनानोंदणी क्रमांकाची बुलेट निष्काळजीपणे, हयगईने चालवून पारगाव टोलनाका येथील बुथ क्र. ५ च्या बाजूच्या अडथळ्यांना धडक दिली. या अपघातात रामलिंगे सारणे हे स्वत: गंभीर जखमी होउन मयत झाले. अशा मजकुराच्या पथकर नाका कर्मचारी- प्रविण प्रभाकर ढास यांनी काल दि. १७.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३०४ (अ) आणि मो.वा.का. कलम- १८४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, मुरुम:** विश्वनाथ हरीभाउ कांबळे, रा. तुगाव गावठाण क्र.१, ता. उमरगा व त्यांचा नातू- परमेश्वर कांबळे असे दोघे दि. १५.११.२०२० रोजी ११.०० वा. सु. नळवाडी फाटा येथील रस्त्याने ॲक्टीव्हा स्कुटर क्र. एम.एच. २० एएम ५७४७ ने प्रवास करत होते. यावेळी बस क्र. एम.एच. २० बीएल १३३८ च्या

अज्ञात चालकाने बस निष्काळजीपणे चालवून परमेश्वर कांबळे चालवत असलेल्या नमूद स्कुटरला पाठीमागून धडक दिली. या अपघातात विश्वनाथ कांबळे व परमेश्वर कांबळे हे दोघे गंभीर जखमी झाले. अशा मजकुराच्या विश्वनाथ कांबळे यांनी काल दि. १७.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३७, ३३८ आणि मो.वा.का. कलम- १८४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, लोहारा:** चंद्रकांत महादेव मुळे, रा. सलगरा (दि.), ता. तुळजापूर व त्यांची मुलगी- प्रणिता असे दोघे दि. ३०.१०.२०२० रोजी १५.०० वा. सु. नागराळ, ता. लोहारा येथील रस्त्याने मोटारसायकलने प्रवास करत होते. दरम्यान एका बोलेरो गाडीच्या अज्ञात चालकाने बोलेरो गाडी निष्काळजीपणे चालवून चंद्रकांत मुळे यांच्या मोटारसायकलला समोरुन धडक दिली. या अपघातात चंद्रकांत मुळे व त्यांची मुलगी- प्रणिता हे दोघे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर संबंधी बोलेरो चालक घटनास्थळावरुन वाहनास्ह पसार झाला. अशा मजकुराच्या चंद्रकांत मुळे यांनी काल दि. १७.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३७, ३३८ आणि मो.वा.का. कलम- १८४, १३४ (अ) (ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “मारहाण.”

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** समाधान बालीश निकम, रा. जवळगा (मे.), ता. तुळजापूर यांना दि. १७.११.२०२० रोजी ०६.०० वा. सु. जवळगा (मे.) शेतशिवारात गावकरी- नेताजी नागाप्पा लोखंडे यांनी समाधान यांना, “माझ्या शेतात दगड का आकलेस.” असा जाब विचारुन समाधान यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी, लोखंडी सळईने मारहाण करुन जखमी केले तसेच ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या समाधान निकम यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** शरद भागवत पवार, रा. टेलरनगर, इटकळ, ता. तुळजापूर यांना दिंडेगाव येथील आकाश घोडके यांनी उसने पैसे मागीतले असता पवार यांनी नकार दिल्याने आकाश घोडके यांनी चिडून जाउन पवार यांना शिवीगाळ केली होती. सदर प्रकार शरद पवार यांनी आकाश यांच्या वडीलांना सांगीतला होता. याचाच राग मनात धरुन आकाश घोडके यांसह शिवाजी घोडके, नवनाथ घोडके यांनी दि. १७.११.२०२० रोजी १९.३० वा. सु. दिंडेगाव येथे शरद पवार यांना लाथाबुक्क्यांनी, काठीने मारहाण करुन ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या शरद पवार यांनी आज दि. १८.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

---

**जनसंपर्क विभाग, उस्मानाबाद पोलीस.**